# Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Aksharbharati (Part- 4): Chapter 16- स्वप्न करू साकार





For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com, 52, Shilpa Nagar, Somalwada Nagpur - 440015
Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888, **Website:** https://www.indcareer.com


https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-aksharbharati-part-4-chapter-16-svapn-karu-sakar/

# Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Aksharbharati (Part- 4): Chapter 16- स्वप्न करू साकार

Class 10: Marathi Aksharbharati Chapter 16 solutions. Complete Class 10 Marathi Aksharbharati Chapter 16 Notes.

## Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Aksharbharati (Part- 4): Chapter 16- स्वप्न करू साकार

Maharashtra Board 10th Marathi Aksharbharati Chapter 16, Class 10 Marathi Aksharbharati Chapter 16 solutions

**प्रश्न 1.**

खालील शब्दसमूहांतील संकल्पना स्पष्ट करा.

(i) श्रमशक्तीचे मंत्र

(ii) हस्त शुभंकर

(iii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार

उत्तरः

(i) श्रमशक्तीचे मंत्र – श्रमाचे महत्त्व

(ii) हस्त शुभंकर – राबणारे हात, पवित्र हात, कल्याणकारी हात

(iii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार – उत्क्रांतीचा, प्रगतीचा जयघोष

**प्रश्न 2.**

आकृतिबंध पूर्ण करा.

(अ)




(आ)




उत्तरः

(i)




(ii)




प्रश्न **3.**

काव्यसौंदर्य,

(अ) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार

नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।

उत्तरः

कवी म्हणतात की, या देशाची माती, येथील संस्कृती, येथील परंपरा आम्हा भारतीयांची आहे. त्यावर फक्त आमचाच अधिकार आहे. मुळात भारत हा कृषिप्रधान देश आहे. काळ्या मातीची मशागत करून धनधान्याची निर्मिती करणे व धरतीला सुजलाम् सुफलाम् करणे हे त्याचे कर्तव्यच आहे. त्यासाठी तो आयुष्यभर कष्ट करत असतो.त्याच्या कष्टातूनच कृषिसंस्कृती निर्माण होते. या कृषिसंस्कृतीमुळेच नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न साकार होत असते.

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-aksharbharati-part-4-chapter-16-svapn-karu-sakar/

IndCareer

(आ) खालील पंक्तींमधून सूचित होणारा अर्थ लिहा.

घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

उत्तरः

येथे जन्माला येणारे प्रत्येक बाळ तेजस्वी व प्रबळ असेल. देशाचे रक्षण करण्यासाठी, नवीन कार्यासाठी घराघरातून जणू नवी पिढी जन्म घेईल आणि आपल्या शक्तीतून, आपल्या कार्यातून आपल्या विजयाचा अवतार साऱ्या जगासमोर उभा करेल. म्हणजेच सामर्थ्यशाली बालके जन्मास येऊन देशाचे भविष्य नक्कीच उज्ज्वल करतील, असा एक आशावाद कवीने येथे मांडलेला आहे.

शेतकरी जणू आपल्या कष्टाने चैतन्याचे, आनंदाचे सुदर्शनचक्र फिरवत असतो. त्याच्या मेहनतीमुळेच शेताशेतांतून धान्यरूपी मोत्याचे 'सुदर्शन' आपल्याला घडते. त्याच्याबरोबर मेहनत करून आपणही या शेतातून, मातीमधून मोती म्हणजेच धान्यरूपी अपार धन पिकवूया. आपल्या धरतीला सुलजाम् सुफलाम् बनवूया.

(इ) या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.

उत्तरः

प्रस्तुत कवितेत श्री. किशोर पाठक यांनी 'एकजूटीचे सामर्थ्य' हे मूल्य मनात रूजविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. कोणतेही काम एकट्याने करून पूर्ण होत नाही. घरी तयार होणाऱ्या अन्नपदार्थांसाठी अगदी शेतकरी दादा पासून, दुकानदार, कामगार, वाहतूक या सर्व घटकांची मदत आवश्यक असते. तसेच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीने काम करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

'हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट' या पंक्तीवरून सिद्ध होते की, देशाची जनता एकत्र आली तर मनगटात बळकटी येईल व प्रगती शक्य होईल. सर्वांची शक्ति पणाला लावून शेती व उदयोग यामध्ये उत्क्रांती होईल. या मातीवर जसा सर्वांचा अधिकार आहे, तसाच सर्वांनी मिळून मिसळूनच नव्या युगाचे स्वप्न साकारायचे आहे. भारताची संस्कृती व परंपरा थोर आहे, पण ती जपून वाढवायची आहे. हे एकजूटीने साध्य होणार आहे. साऱ्या विश्वात एकजुटीने भारताचा जयजयकार करायचा आहे.

(ई) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.

उत्तरः

प्रस्तुत कवितेत श्री. किशोर पाठक यांनी 'एकजूटीचे सामर्थ्य' हे मूल्य मनात रूजविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. कोणतेही काम एकट्याने करून पूर्ण होत नाही. घरी तयार होणाऱ्या अन्नपदार्थांसाठी अगदी शेतकरी दादा पासून, दुकानदार, कामगार, वाहतूक या सर्व घटकांची मदत आवश्यक असते. तसेच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीने काम करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

'हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट' या पंक्तीवरून सिद्‌ध होते की, देशाची जनता एकत्र आली तर मनगटात बळकटी येईल व प्रगती शक्य होईल. सर्वांची शक्ति पणाला लावून शेती व उदयोग यामध्ये उत्क्रांती होईल. या मातीवर जसा सर्वांचा अधिकार आहे, तसाच सर्वांनी मिळून मिसळूनच नव्या युगाचे स्वप्न साकारायचे आहे. भारताची संस्कृती व परंपरा थोर आहे, पण ती जपून वाढवायची आहे. हे एकजूटीने साध्य होणार आहे. साऱ्या विश्वात एकजुटीने भारताचा जयजयकार करायचा आहे.

प्रश्न १. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा,

कृती १: आकलन कृती

प्रश्न **1.**

आकृतिबंध पूर्ण करा.




प्रश्न **2.**

चौकट पूर्ण करा.

(i) फुलामुलांतून हसणारा – श्रावण

(ii) मातीचे मंगल – तनमन

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-aksharbharati-part-4-chapter-16-svapn-karu-sakar/

(iii) चैतन्याचे – सुदर्शन

(iv) अपरंपार धन – शेतातील मोती

**प्रश्न 3.**

सहसंबंध लिहा.

**(i)** हजार आम्ही : एकी बळकट :: सर्वांचे हो : ……………………….

उत्तरः

एकच मनगट

**प्रश्न 4.**

कंसातील योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.

(i) नव्या पिढीचे, नव्या युगाचे ……………………… करू साकार।। (स्वप्न, दिवास्वप्न, जग, पृथ्वी)

(ii) फुलामुलांतून हसतो ……………………… मातीचे हो मंगल तनमन, (चैत्र, वैशाख, श्रावण, माघ)

(iii) उदयोगाचे चक्र चालते ……………………… उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।। (धरतीवर, पाण्यावर, आभाळावर, हवेवर)

(iv) शक्तीचीही झडते ……………………… घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।। (दौलत, नौबत, धनदौलत, पत)

(iv) ……………………… शुभंकर हवा एकदा भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।। (हस्त, बाहू, पद, वद)

उत्तर:

(i) स्वप्न

(ii) श्रावण

(iii) आभाळावर

(iv) नौबत

(v) हस्त

प्रश्न **5.**

जोड्या जुळवा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | यंत्र डोलते | (अ) | शक्तिची |
| (ii) | मंत्र बोलते | (आ) | उद्योगाचे |
| (iii) | चक्र चालते | (इ) | श्रमशक्तीचे |
| (iv) | झडते नौबत | (ई) | हातांनी |

उत्तर:

(1 – ई)

(ii- इ)

(iii – आ)

(iv – अ)

कृती २: आकलन कृती

प्रश्न **1.**

ओघतक्ता पूर्ण करा.

**जपू वाढवू**
↓
विश्वाची संपदा
↓
**उज्ज्वल करू**
↓
देशाचे भविष्य

प्रश्न **2.**

एका वाक्यात उत्तरे लिहा**.**

**(i)** कवी कोणावर आमुचा अधिकार आहे असे म्हणतो**?**

उत्तरः

कवी या देशाच्या मातीवर आमुचा अधिकार आहे असे म्हणतो.

**(ii)** कवी शेतामधून काय पिकवायला सांगतात**?**

उत्तरः

कवी शेतामधून मोती पिकवायला सांगतात.

**(iii)** कवी उत्क्रांतीचा ललकार कोठे घुमवायला सांगतात**?**

उत्तरः

कवी आभाळावर उत्क्रांतीचा ललकार घुमवायला सांगतात.

प्रश्न **3.**

काव्यपंक्तीचा योग्य क्रम लावा**.**

(i) भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

(ii) घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

(iii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

(iv) शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

उत्तर**:**

(i) शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

(ii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

(iii) घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

(iv) भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

प्रश्न **4.**

खालील शब्दांसाठी कवितेतील समानार्थी शब्द शोधा.

(i) हक्क – अधिकार।

(ii) ऐश्वर्य – विभव।

प्रश्न **5.**

‘श्रावण’ हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

उत्तर:

फुलांमुलांतून कोण हसतो?

कृती ३: कवितेतील शब्दांचा अर्थ

प्रश्न **1.**

खालील कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.

(i) देश

(ii) अधिकार

(iii) मंगल

(iv) चैतन्य

उत्तर:

(i) राष्ट्र

(ii) हक्क

(iii) पवित्र

(iv) उत्साह

प्रश्न २. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा.

(१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री:

किशोर पाठक

(२) प्रस्तुत कवितेचा विषयः

भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे.

(३) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ:

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार

नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।

(४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश:

या देशाच्या मातीत आपण जन्म घेतला आहे. त्यामुळे हा देश आपला आहे. नवीन पिढीने, नवीन युगाने आपल्या देशात स्वत:च्याच प्रगतीचा विचार न करता देशाचाही विचार केला पाहिजे. देशाला प्रगतीपथावर नेण्याचे स्वप्न पाहिले पाहिजे व ते एकतेने आणि जिद्दीने पूर्ण केले पाहिजे. याचाच अर्थ असा की, आपण श्रमाने मातीतून मोती पिकवू, उद्योग जगतात क्रांती करू, एकजूटीने राहू व देशाचे भविष्य उज्ज्वल करू असाच संदेश या कवितेतून मिळतो.

(४) प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारण:

'स्वप्न करू साकार' ही कविता मला खूप आवडली आहे. त्याचे मुख्य कारण कवितेच्या सुरुवातीलाच कवीने नव्या पिढीच्या व नव्या युगाच्या मनात देशाप्रती आपलेपणाची भावना जागृत केलेली आहे. त्यानंतर या आपल्या देशाच्या उन्नतीसाठी कार्य करण्याची प्रेरणा दिली आहे. पण केवळ प्रेरणा देऊनच ते थांबले नाहीत तर देशाच्या उन्नतीचा मार्गही म्हणजेच कृषिविकास, उदयोग क्षेत्रातील विकास, संस्कृतीचे जतन-संवर्धन त्यांनीच समजावून सांगितला आहे. त्यासाठी एकोप्याने काम करायला हवे, हे सांगायलाही ते विसरले नाहीत. हे सर्व आपण मनापासून केले तर नव्या पिढीचे. नव्या युगाचे आपल्या उज्ज्वल भारत देशाचे स्वप्न पूर्ण होईल असा सुंदर आशावाद त्यांनी मांडला आहे.

(६) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ:

(i) धन – संपत्ती

(ii) श्रम – मेहनत, कष्ट

(iii) ललकार – जयघोष

(iv) बळकट – मजबूत

स्वाध्याय कृती

**(२) या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.**

उत्तरः

'स्वप्न करू साकार' कवितेत कवी 'किशोर पाठक' यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रंगविले आहे. देशात नव्या पिढीचे आगमन होत आहे. नवे युग चालू आहे तेव्हा नवीन कल्पना, नवी उमेद आहे. कवीला देशाच्या मातीतून मोती पिकवायचे आहेत. भरघोस धान्याचे पिक घ्यायचे आहे. मातीचा कस सुधारायचा आहे. श्रावणसरींनी हसणाऱ्या, फुलणाऱ्या फुलांना व मुलांना पहायचे आहे. श्रमप्रतिष्ठेवर भर देऊन प्रयत्नांची कास धरायची आहे. औक्यौगिक प्रगती करायची आहे. एकोप्याने देशाची वैभव संपदा केवळ जपायचीच नाही तर वाढवायची आहे.

नव्या पिढीला श्रमशक्ती, यंत्र यांचा मंत्र क्यायचा आहे. देशासाठी झटणारे शुभंकर, कल्याणकारी हात तयार करायचे आहेत. देशाचे नाव उज्ज्वल करून सगळ्या जगात आपल्या देशाचा नावलौकिक वाढवायचा आहे.

स्वप्न करू साकार काव्यपरिचय

'स्वप्न करू साकार' ही कविता 'किशोर पाठक' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने श्रमाने मातीतून मोती पिकवू, एकजूटीने राहू व देशाचे भविष्य उज्ज्वल करू असा संदेश दिला आहे. कृषी व उदयोग जगतात क्रांती करण्याची प्रेरणा या कवितेतून मिळते.

With consolidated effort, we can have good quality grains. United endeavours can lead to the prosperous future of our country. This is the message given by the poet. The poem motivates us to strive for agricultural and industrial revolution.

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार

नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।

कवीने आपल्या भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न सुंदरपणे रेखाटले आहे. कवी म्हणतात की, या देशाची माती, येथील संस्कृती, येथील परंपरा आम्हा भारतीयांची आहे. त्यावर फक्त आमचाच अधिकार आहे. मुळात भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी हा इथला भूमिपुत्र आहे. या शेतकऱ्याचा या मातीवर परंपरेपासून खरा अधिकार आहे. काळ्या मातीची मशागत करून धनधान्याची निर्मिती करणे व धरतीला सुजलाम् सुफलाम् करणे हे त्याचे कर्तव्यच आहे. त्यासाठी तो आयुष्यभर कष्ट करत असतो. त्याच्या कष्टातूनच कृषिसंस्कृती निर्माण होते. या कृषिसंस्कृतीमुळेच नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न साकार होत असते. म्हणूनच कवी म्हणतात की, येथील संस्कृती, येथील परंपरा यांचे जतन करून आपण सारेजण नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न साकार करूया.



फुलामुलांतून हसतो श्रावण

मातीचे हो मंगल तनमन

चैतन्याचे फिरे सुदर्शन

शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

कवीने आपल्या भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे सुंदर स्वप्न रेखाटतांना कृषिसंस्कृतीचे महत्त्व आपल्याला पटवून दिले आहे. कवी म्हणतात की, शेतकऱ्यांच्या कष्टांमुळेच फुलामुलांतून श्रावण हसत असतो. म्हणजेच श्रावण महिन्यामध्ये सारी धरती व तिची बाळे आनंदित होतात. खरे तर ऊनपावसाचा खेळ चालू असणाऱ्या श्रावण महिन्यामध्ये धरती हिरव्या रानांनी, पाना–फुलांनी सजलेली असते. शेतकऱ्यांच्या मेहनतीने, कष्टाने इथली माती म्हणजेच इथली शेते धनधान्याने डोलू लागलेली असतात. धरतीचे हे सौंदर्य पाहून सगळे जण आनंदित होतात. चैतन्यमय, प्रसन्न वातावरण सर्वत्र निर्माण झालेले असते. ज्याप्रमाणे सुदर्शनचक्र फिरले की, दु:खाचा, अडचणींचा नाश होतो आणि सर्वत्र आनंद पसरतो, त्याचप्रमाणे शेतकरी जणू आपल्या कष्टाने चैतन्याचे, आनंदाचे सुदर्शनचक्र फिरवत असतो. त्याच्या मेहनतीमुळेच शेताशेतातून धान्यरूपी मोत्याचे 'सुदर्शन' आपल्याला घडते. त्याच्याबरोबर मेहनत करून आपणही या शेतातून, मातीमधून मोती म्हणजेच धान्यरूपी अपार धन पिकवूया. आपल्या धरतीला सुलजाम् सुफलाम् बनवूया.

या हातांनी यंत्र डोलते

श्रमशक्तीचे मंत्र बोलते

उदयोगाचे चक्र चालते

आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे चित्र रेखाटताना कवी पुढे म्हणतात की, भारत हा कृषिप्रधान देश असला तरी इथे इतर उदयोगधंदेही चालतात. देशातील अनेक जण यंत्राच्या सहाय्याने काम करून उदयोगचक्रात मग्न आहेत. जसे शेतकरी, मजूर शेतात राबून शारीरिक कष्ट करत आहेत. तसेच अनेक कामगार यंत्रावर काम करत आहेत. त्यांच्या श्रमामुळे यंत्र डोलतात म्हणजेच यंत्र चालतात व प्रगतीची चाके फिरू लागतात. या यंत्रातून येणारा आवाज ऐकून कवीला असे वाटते, जणू हा नुसता आवाज नाही तर श्रमशक्तीचा मंत्र चालू आहे. कवी म्हणतात की, सारेजण श्रमशक्तीचा मंत्र जपत आहेत, म्हणजेच कष्ट करत आहेत व आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये हातभार लावत आहेत. उदयोगाचे हे चक्र सदैव चाललेलेच आहे. आपणही त्यामध्ये सहभागी होऊन नवनवे शोध लावूया. शेतीमध्ये नवेनवे बदल, नव्या सुधारणा आणून तसेच उद्योगक्षेत्रांमध्ये नव्या संकल्पना आणून आपली व आपल्या देशाची भरभराट करूया. तसेच नव्या उत्क्रांतीचा म्हणजे नव्या बदलांचा, नव्या शोधांचा, नव्या संकल्पनांचा सगळ्या आभाळावर ललकार घुमवूया म्हणजेच साऱ्या जगामध्ये नव्या गोष्टींचा जयजयकार करूया. सगळ्या जगभर हे नवे शोध, नव्या संकल्पना आपण आपल्या मेहनतीने पोहचवूया.



हजार आम्ही एकी बळकट

सर्वांचे हो एकच मनगट

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-aksharbharati-part-4-chapter-16-svapn-karu-sakar/

शक्तीचीही झडते नौबत

घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

कवीने आपल्या भारत देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीचा मंत्र सांगितला आहे. एकजूटीचे सामर्थ्य पटवून देतांना कवी म्हणतात की, आमच्या देशात अनेक प्रकारची विविधता आहे. वेश, भाषा, धर्म, सण, खाणे अशी हजारो प्रकारची विविधता असली तरी आम्ही एकच आहोत. आमच्यातील एकता जराही कमी झालेली नाही. आम्ही भारतीय लोक देशाच्या विविध प्रांतात राहणारे असलो, वेगवेगळी भाषा बोलणारे जरी असलो, वेगवेगळे वेश परिधान करणारे जरी असलो तरी आम्ही एकजूटीने कार्य करणारे आहोत. त्यामुळे आमच्या हाताचे मनगट बलशाली, शक्तीशाली असेच आहे. याच एकजूटीने आपण आजवर अनेक कठीण प्रसंगावर मात केलेली आहे व पुढेही करत राहू. याच शक्तीने, एकीच्या बळाने आपल्या देशाची प्रगती होईल. शत्रूला धाक बसेल, शक्तीचे प्रदर्शन होईल तसेच एकात्मतेची भावना लोकांच्या मनात अजून वाढेल, जणू सर्वत्र शक्तीची नौबत झडेल. इथे जन्माला येणारे प्रत्येक बाळ तेजस्वी व प्रबळ असेल, देशाचे रक्षण करण्यासाठी, नवीन कार्यासाठी घराघरातून जणू नवी पिढी जन्म घेईल आणि आपल्या शक्तीतून, आपल्या कार्यातून आपल्या विजयाचा अवतार साऱ्या जगासमोर उभा करेल. म्हणजेच सामर्थ्यशाली बालके जन्मास येऊन देशाचे भविष्य नक्कीच उज्ज्वल करतील, असा एक आशावाद कवीने येथे मांडलेला आहे.

या विश्वाची विभव संपदा

जपू वाढवू आम्ही लाखदा

हस्त शुभंकर हवा एकदा

भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

आपल्या भारत देशाला हजारो वर्षांचा इतिहास लाभलेला आहे. आपली संस्कृती अतिप्राचीन व उच्च आहे. कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा तसेच एकजूटीचे सामर्थ्य या मूल्यांमुळे साऱ्या जगात आपल्या देशाने मानाचे स्थान संपादन केले आहे. म्हणून कवी म्हणतात की, आपल्या देशाची ही वैभवशाली संपदा आपण मनापासून जपू, तिचे रक्षण करू आणि तिच्यामध्ये चांगली भर घालून तिला वाढवू. त्यासाठीच कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा तसेच एकजूटीचे सामर्थ्य ही मूल्ये आपण मनापासून जपली पाहिजेत, या मूल्यांचा आदर वाढविणारा, आपल्या देशाच्या वैभवशाली संपदेला सांभाळणारा शुभंकर, कल्याणकारी हात मात्र हवा अशी इच्छा कवी व्यक्त करतात. त्यामुळे आपल्या देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. तसेच सर्वत्र आपल्याच देशाचा जयजयकार होईल.

स्वप्न करू साकार शब्दार्थ

- पिढी – वंश, परंपरा – (generation)
- युग – काळ – (era)
- मंगल – पवित्र – (holy)
- चैतन्य – चेतना – (consciousness)
- सुदर्शन – चक्र – (a weapon of lord Vishnu)
- शेत – माळ, शिवार – (farm)

- धन – संपत्ती – (wealth)
- अपरंपार – खूप, पुष्कळ – (abundance)
- यंत्र – मशीन – (machine)
- मंत्र – स्तुतीयुक्त प्रार्थना – (hymns)
- चक्र – चाक – (wheel)
- उदयोग – काम – (work)
- आभाळ – आकाश – (sky)
- उत्क्रान्ती – क्रान्ती – (revolution)
- ललकार – जयघोष – (cheer)
- एकी – एकजूट – (unity)
- मनगट – मणिबंध – (wrist)
- यालि – ताकद – (power)
- नौबत – काळ, स्थिती – (condition)
- अवतार – देहधारणा – (incarnation)
- विश्व – जग, दुनिया – (world)
- विभव संपदा – ऐश्वर्य, संपत्ती – (wealth)
- लाखदा – अनेक वेळा – (many times)
- हस्त – कर, हात – (hand)
- शुभंकर – हितकारी – (well being)
- भविष्य – आगामी – (future)
- उज्ज्वल – संपन्न – (prosperous)
- अधिकार – हक्क – (privilege)

# Maharashtra Board Solutions Class 10 Marathi Aksharbharati

Part 1

- Chapter 1- तू बुद्धी दे
- Chapter 2.1- संतवाणी अंकिला मी दास तुझा-संत नामदेव
- Chapter 2.2- संतवाणी योगी सर्वकाळ सुखदाता-संत एकनाथ
- Chapter 3- शाल
- Chapter 4- उपास
- Chapter 4.1- मोठे होत असलेल्या मुलांनो...

Part 2

- Chapter 5- दोन दिवस
- Chapter 6- चुडीवाला
- Chapter 7- फूटप्रिन्टस
- Chapter 8- ऊर्जाशक्तीचा जागर
- Chapter 8.1- जाता अस्ताला

Part 3

- Chapter 9- औक्षण
- Chapter 10- रंग साहित्याचे
- Chapter 11- जंगल डायरी
- Chapter 12- रंग मजेचे रंग उदयाचे
- Chapter 12.1- जगणं कॅक्टसचं

Part 4

- Chapter 13- हिरवंगार झाडासारखं
- Chapter 14- बीज पेरले गेले
- Chapter 15- खरा नागरिक
- Chapter 16- स्वप्न करू साकार
- Chapter 16.1- व्युत्पत्ती कोश

# About About Maharashtra State Board (MSBSHSE)

The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or MSBSHSE (Marathi: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), is an **autonomous and statutory body established in 1965**. The board was amended in the year 1977 under the provisions of the Maharashtra Act No. 41 of 1965.

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE), Pune is an independent body of the Maharashtra Government. There are more than 1.4 million students that appear in the examination every year. The Maha State Board conducts the board examination twice a year. This board conducts the examination for SSC and HSC.

The Maharashtra government established the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, also commonly referred to as Ebalbharati, in 1967 to take up the responsibility of providing quality textbooks to students from all classes studying under the Maharashtra State Board. MSBHSE prepares and updates the curriculum to provide holistic development for students. It is designed to tackle the difficulty in understanding the concepts with simple language with simple illustrations. Every year around 10 lakh students are enrolled in schools that are affiliated with the Maharashtra State Board.

# FAQs

Where do I get the Maharashtra State Board Books PDF For free download?

You can download the Maharashtra State Board Books from the eBalbharti official website, i.e. cart.ebalbharati.in or from this article.

Add image

How to Download Maharashtra State Board Books?

Students can get the Maharashtra Books for primary, secondary, and senior secondary classes from here. You can view or download the Maharashtra State Board Books from this page or from the official website for free of cost. Students can follow the detailed steps below to visit the official website and download the e-books for all subjects or a specific subject in different mediums.

Step 1: Visit the official website *ebalbharati.in*

Step 2: On the top of the screen, select "Download PDF textbooks"

Step 3: From the "Classes" section, select your class.

Step 4: From "Medium", select the medium suitable to you.

Step 5: All Maharashtra board books for class 11th will now be displayed on the right side.

Step 6: Click on the "Download" option to download the PDF book.

Who developed the Maharashtra State board books?

As of now, the MSCERT and Balbharti are responsible for the syllabus and textbooks of Classes 1 to 8, while Classes 9 and 10 are under the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE).

How many state boards are there in Maharashtra?

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, conducts the HSC and SSC Examinations in the state of Maharashtra through its nine Divisional Boards located at Pune, Mumbai, Aurangabad, Nasik, Kolhapur, Amravati, Latur, Nagpur and Ratnagiri.

# About IndCareer

IndCareer.com is a leading developer of online career guidance resources for the Indian marketplace. Established in 2007, IndCareer.com is currently used by over thousands of institutions across India, including schools, employment agencies, libraries, colleges and universities.

IndCareer.com is designed to assist you in making the right career decision - a decision that meets your unique interests and personality.

For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com

52, Shilpa Nagar,

Somalwada

Nagpur - 440015

Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888

**Website:** https://www.indcareer.com